महाराष्ट्र शासन
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

क्रमांक:अशैसं-२००९/१०६३/प्र.क्र.३९/२००९/का.१,     दिनांक :- ३ ऑक्टोबर, २००९.

## अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र

श्री गुरु गणेश स्थानक वासी जैन शिक्षण समिती, डी.के.एम.एन.होमिओपॅथिक, मेडीकल कॉलेज, बेबीका मकबरामागे, पहाडसिंगपुरा, औरंगरबाद ४३१ ००४ या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस धार्मिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.२०.०८.२००९ रोजी अर्ज सादर केला होता. दि.१.१०.२००९ रोजी माझ्या समक्ष संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरीकरणाच्या आधारे सदर संस्था ही अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/ प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या धार्मिक (जैन) अल्पसंख्याकामधील व्यक्तींकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचालित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही भारतीय संविधानाच्या कलम ३० अन्वये अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला धार्मिक अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला धार्मिक अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

टी.एफ.थेकेकरा
(टी. एफ. थेकेकरा)
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

अल्पसंख्याक विकास विभाग
महाराष्ट्र शासन

PRINCIPAL
D.K.M.M. HOMOEOPATHIC
MEDICAL COLLEGE
AURANGABAD - 431 004